N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** गडचिरोली **P.S.(ठाणे):** चामोर्शी **Year (वर्ष):** 2020

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0329 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 10/06/2020 19:19 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 05/06/2020
**Date To ( दिनांक पर्यंत):** 10/06/2020
**Time From (वेळेपासून):** 12:05 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:11 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 10/06/2020 **Time (वेळ):** 19:19 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 027 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 10/06/2020 19:19 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 12 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** कुनघाडा बिंट, तळोधि मो बस स्टॉप ,चामोर्शी , 442603

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री रोशन शंकर मडावी

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1993 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | गिलगाव जमी ,चामोर्शी ,गडचिरोली,गडचिरोली,महाराष्ट्र,442603,भारत |
| 2 | स्थायी पता | गिलगाव जमी ,चामोर्शी ,गडचिरोली,गडचिरोली,महाराष्ट्र,442605,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-8459091362

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | पोउपनि शिवराज माणिकराव कदम | | | 1. पो म के पोटेगाव ,चामोर्शी ,गडचिरोली, गडचिरोली,महाराष्ट्र,भारत-442605 |
| 2 | पोहवा 1263 मंगलदास सिताराम कुलसंगे | | | 1. पो म के पोटेगाव ,चामोर्शी ,गडचिरोली, गडचिरोली,महाराष्ट्र,भारत-442605 |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | वाहने आणि इतर | मोटर साइकल | MH 33 E 5366 जुनी वापरती | 30,000.00 |
| 2 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | रू.50,000/ लाचेची रक्कम | 50,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकुण मुल्य (रू. मध्ये)):** 80,000.00

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक 10/06/2020नांव:- श्री रोशन शंकर मडावी, वय 27 वर्षे, धंदा-पेंटींग आणि वाहन चालक, मु.पो. गिलगाव (जमी.), ता. चामोर्शी, जि. गडचिरोली. मो.नं. 8459091362.मी दिनांक 05/06/2020 रोजी श्री रवि जी. राजुलवार, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय गडचिरोली यांचे समक्ष लोकसेवकांविरूद्ध लाच मागणी संबंधाने तक्रार नोंदविली. श्री रवि जी. राजुलवार, पोलीस निरीक्षक यांनी माझे सांगण्याप्रमाणे माझी लेखी तक्रार नोंदवून त्यावर माझी सही घेतली. मी नोंदवलेली तक्रार खालीलप्रमाणे आहे.मी मु. पो. गिलगाव (जमी.), ता. चामोर्शी, जि. गडचिरोली येथील रहीवासी असुन वाहन चालक असुन चारचाकी वाहन चालविण्याचे काम करतो. आम्ही तिघे भाऊ असुन माझा मोठा भाऊ नामे रोहीदास उर्फ रोहीत शंकर मडावी, वय 38 वर्षे, हा शेती करतो. दि. 05/06/2020 रोजी सकाळी अंदाजे 0600 वा. आमच्या राहत्या घरून माझा भाऊ रोहीदास उर्फ रोहीत याला पिएसआय कदम साहेब तसेच जमादार श्री मंगलदास कुलसंगे दोघेही नेमणुक पोटगाव पोलीस मदत केंद्र, पोलीस स्टेशन गडचिरोली हे आपल्या सोबत मोटर सायकलवर बसवुन 307 च्या गुन्ह्यात अटक करण्यासाठी पो.म.के. पोटेगाव येथे घेवुन गेले. त्यामुळे मी पिएसआय कदम साहेबांना भेटलो असता त्यांनी तसेच कुलसंगे हवालदार यांनी सांगीतले कि, तुझ्या भावाला त्या गांगलवारच्या 307 च्या गुन्ह्यात आम्ही अटक करणार आहे. त्याला सोडवायचे असेल तर आताच्या आत्ता रू. 70,000/- द्यावे लागतील. यावर मी त्यांना, साहेब, एकदम इतके पैसे एकाच वेळी देऊ शकत नाही. असे सांगीतल्यावर त्यांनी मला जसे जमतील तसे लवकर करून द्या आणि आपल्या भावाला सोडवुन घ्या असे सांगुन माझ्या भावाला पोटगावला ठेवुन मला पैष्याची व्यवस्था करण्यासाठी जाण्यास सांगीतले. श्री षिवराज कदम, पोलीस उपनिरीक्षक तसेच श्री मंगलदास कुलसंगे, पोलीस हवालदार दोघेही नेमणुक पोटगाव पोलीस मदत केंद्र, पोलीस स्टेषन गडचिरोली यांनी माझे भावाला पो.स्टे. गडचिरोली अप.क्रं. 173/2020 कलम 307, 504, 506 भा.दं. वि.च्या गुन्ह्यात आरोपी करून अटक न करण्याच्या कामासाठी रू.70,000/- लाच रक्कमेची मागणी करित आहेत. श्री षिवराज कदम, पोलीस उपनिरीक्षक तसेच श्री मंगलदास कुलसंगे, पोलीस हवालदार दोघेही नेमणुक पोटगाव पोलीस मदत केंद्र, पोलीस स्टेषन गडचिरोली यांना रु. 70,000/- लाच रक्कम देण्याची माझी मुळीच ईच्छा नसल्याने मी रु.70,000/- सोबत घेऊन आपले कार्यालयामार्फत कारवाई होणेकरीता स्वेच्छेने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गडचिरोली येथे तक्रार देण्यास आलो आहे. श्री षिवराज कदम, पोलीस उपनिरीक्षक तसेच श्री मंगलदास

कुलसंगे, पोलीस हवालदार दोघेही नेमणुक पोटगाव पोलीस मदत केंद्र, पोलीस स्टेषन गडचिरोली यांचेषी माझे कोणतेही वैयक्तीक वैर नसुन आर्थिक देवाण-घेवाण/उसणवारी अथवा भांडण नाही. म्हणुन मी त्यांचे विरुध्द कायदेषिर कारवाई करण्याकरीता स्वेच्छेने तक्रार देत आहो. मी सोबत आणलेले रु.70,000/- हे माझे वैयक्तिक बचतीतील आहेत.त्यानंतर श्री रवि राजुलवार, पोलीस निरीक्षक यांनी 2 शासकिय पंचांना पाचारण करून त्यांची व माझी एकमेकांना ओळख करून दिली. श्री रवि राजुलवार, पोलीस निरीक्षक यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकिकत सांगुन माझा लेखी तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. त्यानंतर सदरच्या तक्रार अर्जावर दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर श्री रवि राजुलवार, पोलीस निरीक्षक यांनी सुद्धा स्वाक्षरी केली.श्री रवि राजुलवार, पोलीस निरीक्षक यांनी व्हॉईस रेकार्डर कष्याप्रकारे काम करतो. याबाबत सविस्तर माहीती देवुन लाच मागणीची पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हईस रेकर्डरद्वारे रेकर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले आणि सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर श्री रवि राजुलवार, पोलीस निरीक्षक यांनी माझेकडुन सापळा कारवाईसाठी वापरण्यात येणारी लाच रक्कम रू.70,000/- (रू. 500/- दराच्या 132, रु. 200/- दराच्या 13 व रु. 100/- दराच्या 14 चलनी नोटा) घेतले. त्यावेळी सदरच्या नोटांचे क्रमांक नोंदवुन घेण्यात आले. त्यानंतर सदरच्या नोटांना अँथ्रसिन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्याचे गुणधर्म व प्रात्यक्षीक करून दाखवुन लाचेच्या रक्कमेस अँथ्रसिन पावडर लावली. याबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी श्री रवि राजुलवार यांनी पंचनामा क्रं. 1 मध्ये घेतल्या आहेत.दिनांक 05/06/2020 रोजी श्री रवि राजुलवार, पोलीस निरीक्षक, मी, षासकीय पंच व स्टाफ सह लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय गडचिरोली येथुन षासकिय वाहनाने रवाना होवुन मौजा नवेंगाव गावाचे अलीकडे पोहचुन रस्त्याचे कडेला आडोसा घेवून थांबून होतो. त्यानंतर श्री रवि राजुलवार, पोलीस निरीक्षक यांनी पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन त्याप्रमाणे व्हईस रेकर्डर सुरू करून व्हईस रेकर्डरवर पंच क्रं. 1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हईस रेकर्डर माझे ताब्यात देवुन मला पंच क्रं. 1 यांचेसह श्री मंगलदास कुलसंगे, पोलीस हवालदार, नेमणुक पोमके पोटेगाव यांचेकडे जाण्यास रवाना केले. मी श्री मंगलदास कुलसंगे, पोलीस हवालदार यांचेकडे त्यांचे सांगणेप्रमाणे कुनघाडा फाटयावर गेलो असता, त्यांनी माझे भावाला सोडून दिले व मला पोटेगावला जावुन श्री कदम, साहेबांना भेटण्यास सांगीतले. त्यावेळी षिवराज कदम, पोलीस उपनिरीक्षक यांनी पंच क्रं. 1 यांचे समक्ष माझे भावाला पो.स्टे. गडचिरोली अप.क्रं. 173/2020 कलम 307, 504, 506 भा.दं.वि.च्या गुन्ह्यात आरोपी करून अटक न करण्याच्या कामाकरीता रू.70,000/- लाच रक्कमेची मागणी करून तडजोडीअंती रु.50,000/- लाच रक्कम दिनांक 10/06/2020 रोजी पर्यत स्विकारण्याची तयारी दर्षविली. त्यानंतर मी पंच क्रं. 1 सह पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांचेकडे परत गेलो असता, पंच क्रं. 1 यांच्या आवाजानंतर व्हईस रेकर्डर बंद करण्यात आला.त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांनी पंच क्रं. 1 व 2 यांचेसमक्ष व्हईस रेकर्डमध्ये झालेले संभाषणाची टेप ऐकुण लोकसेवक श्री शिवराज कदम, पोलीस उपनिरीक्षक व श्री मंगलदास कुलसंगे, पोलीस हवालदार, पोमके पोटेगाव यांनी माझे भावाला पो.स्टे. गडचिरोली अप.क्रं. 173/2020 कलम 307, 504, 506 भा.दं.वि.च्या गुन्ह्यात आरोपी करून अटक न करण्याच्या कामाकरीता रू.70,000/- लाच रक्कमेची मागणी करून तडजोडीअंती रु.50,000/- लाच रक्कम दिनांक 10/06/2020 पर्यत स्विकारण्याची तयारी दर्शविल्याची खात्री केली. त्यावरून लोकसेवक श्री शिवराज कदम, पोलीस उपनिरीक्षक व श्री मंगलदास कुलसंगे, पोलीस हवालदार, पोमके पोटेगाव यांचेविरूद्ध दिनांक 10/06/2020 रोजी पुढील सापळा करण्याचे ठरविण्यात आले. याबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी श्री रवि राजुलवार यांनी पंचनामा क्रं. 2 मध्ये घेतल्या आहेत.आज दिनांक 10/06/2020 श्री मंगलदास कुलसंगे व श्री कदम यांनी माझे भावाला गिलगाव वरून उचलुन त्याचे मोबाईलवरून मला फोन करून पैसे मौजा चामोर्शी येथे घेवून येण्यास सांगीतल्याचे श्री राजुलवार, पोलीस निरीक्षक यांना मी कळविले. त्यानंतर मौजा चामोर्षी येथे पोहचल्यावर मला पंचासमक्ष अँथ्रसिन पावडर लावलेली लाचेची रक्कम देण्यात आली. ती माझे पंटच्या डाव्या खिश्यात ठेवण्यात आली. सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना देवुन लोकसेवक यांनी स्वतः किंवा इतर व्यक्तीच्या माध्यमातुन लाच रक्कम स्विकारल्यावर आपल्याजवळील दुप्पटा डोक्यास बांधावा असा इषारा करण्याबाबत मला सांगीतले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य इषारा मिळताच लाच रक्कम स्विकारणाऱ्यास रंगे हाथ पकडतील असे सांगण्यात आले. पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांनी व्हईस रेकर्डर सुरू करून व्हईस रेकर्डरवर पंच क्रं. 1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हाईस रेकर्डर माझे ताब्यात देवुन मला पंच क्रं. 1 यांचेसह मौजा चामोर्षी येथे  श्री शिवराज कदम, पोलीस उपनिरीक्षक व श्री मंगलदास कुलसंगे, पोलीस हवालदार, पोमके पोटेगाव यांचेकडे जाण्यास रवाना केले. त्याचवेळी सापळा पथकातील काही सदस्य गटा-गटाने माझे मागोमाग आले. श्री कदम साहेब माझे मोटरसायकलवर बसले व श्री कुलसंगे यांनी माझ्या भावाला  आपल्या मोटारसायकील वर बसवून मौजा तळोधी येथे घेवून गेले. तळोधी येथे पोहोचल्यावर श्री कुलसंगे साहेबांनी लाचेची रक्कम श्री कदम साहेबांना देण्यास सांगीतल्याने मी अँथ्रसिन पावडर लावलेली रू.50,000/- लाचेची रक्कम माझे फुलपंटच्या डाव्या खिष्यातुन काढुन श्री कदम, पोलीस उपनिरिक्षक यांना दिल्या असता, त्यांनी लाच रक्कम रू.50,000/- आपल्या उजव्या हाताने घेवुन दोन्ही हातांनी मोजून आपल्या पंटच्या खिष्यात ठेवली. त्यानंतर माझ्या भावाला व मला तिथेच सोडून मोटारसायकलने मौजा पोटेगावच्या दिशेने निघून गेले. त्यावेळी मी पंच क्रं. 1 सोबत दर्षनी ठिकाणी येवुन सापळा पथकास माझे जवळील दुप्पटा डोक्याला बांधून लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजीत इषारा केला. त्यावेळी सापळा पथकाने शासकिय वाहनाने त्यांचा पाठलाग करून मौजा पोटेगाव येथे रंगेहात पकडुन पुढील कारवाई केली. सापळा कार्यवाहीबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांनी पंचनामा क्रं. 3 मध्ये घेतल्या आहेत.तरी लोकसेवक श्री शिवराज माणिकराव कदम, वय 36 वर्षे, धंदा- नौकरी, पोलीस उपनिरीक्षक व श्री मंगलदास सिताराम कुलसंगे, पोलीस हवालदार, ब.नं. 1263 दोन्ही पोलीस मदत केंद्र पोटेगाव, ता. जि. गडचिरोली यांनी आपल्या लोकसेवक पदाचा दुरूपयोग करून माझे भावाला पो.स्टे. गडचिरोली अप.क्रं. 173/2020 कलम 307, 504, 506 भा.दं.वि.च्या गुन्ह्यात आरोपी करून अटक न करण्याच्या कामाकरीता रू. 70,000/- लाच रक्कमेची मागणी करून तडजोडीअंती रु. 50,000/- लाच रक्कम स्विकारली. म्हणुन माझी त्यांच्याविरूद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यानुसार कायदेषीर फिर्याद आहे. माझी वरिल फिर्याद मराठीत संगणकावर टंकलिखीत केली असुन प्रिंट काढल्यानंतर मी वाचुन पाहीली. ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.        समक्ष ( रवि जी. राजुलवार )   पोलीस निरीक्षक,                    ला.प्र.विभाग, गडचिरोली.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** JITENDRA EKHANATH BORKAR
**Rank (पद):** I (Inspector)
**No.(क्र.):** POBN70652 **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**
**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

Ishan

**15.Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची**

**Name (नाव):** JITENDRA EKHANATH BORKAF
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** POBN70652

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**